**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१-आनंदीबाई आत्माराम घरत</u>**

**<u>यांचा शपथेवर उलटतपास पुढे सुरु</u>**

**<u>वादी यांचेतर्फे वकील श्री. एम.एम. मोकल यांच्यामार्फत</u>**

(१६) पदूबाईच्या वडीलांचे नाव मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पदूबाई बाळारामची पत्नी आहे. हे मला माहित नाही की, पदूबाईचे वडील रामा बाबाजी ठाकूर हे होते. हे मला माहित नाही की, सर्व्हे क्र.५५/५ हे रामा बाबाजी ठाकूर यांना सावकार सदाशिव महादेव देशमुख यांच्याकडून कुळ म्हणून मिळाली आहे. हे मला माहित नाही की, सर्व्हे क्र.५५/५ हे वडीलांनी पदूबाई हिला लग्नामध्ये कन्यादान म्हणून दिली आहे. हे मला माहित नाही की, ३२ग नुसार जमीनीची किंमत किती ठरली होती. हे मला माहित नाही की, ३२ग नुसार जमीनीची किंमत बाळारामचे मुले अनंत, गणेश, वसंत यांनी पैसे भरले व त्यांच्या नावाची जमीन झाली. हे मला माहित नाही की, सदर जमीन अनंत, गणेश व वसंत यांचे नावावरती सातबारावर होती. हे मला माहित नाही की, सदर जमीन संपादीत झाली व संपादीत झाल्यानंतर त्याचा ॲवार्ड अनंत, गणेश व वसंत यांचे नावावर झालेला आहे व नुकसानभरपाईची रक्कम घेतली. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे क्र.५५/५ मध्ये माझे वडीलांचा या जमीनीमध्ये कधीही हक्क व हितसंबंध नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.२४/६ ही मिळकत माझा चुलत भाऊ लक्ष्मण याचे नावावर होती. हे मला माहित नाही की, सर्व्हे क्र.२४/६ या जमीनीचे संपादीत रक्कम लक्ष्मण यानेच घेतली. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे क्र.२४/६ चे ॲवार्ड झाले त्यावर फक्त लक्ष्मण याचे नाव

आहे. माझे नावाने सर्व्हे क्र.२४/६ चा ॲवार्ड झाला आहे, याबद्दल मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे सर्व्हे क्र.२४/६ व सर्व्हे क्र.५५/५ याला नावे लागल्याबाबत मी कुठेही तक्रार केली नाही, तसेच सातबारा किंवा ॲवार्ड होताना तक्रारी अर्ज कुठेही केलेला नाही. हे मला माहित नाही की, सर्व्हे क्र. २४/१० ही जमीन बाळाराम याला संरक्षित कुळ म्हणून सावकार रामचंद्र जोमा कोळी यांचेकडून मिळाली आहे. हे मला माहित नाही की, सर्व्हे क्र.२४/१० ची किंमत बाळाराम याने भरली व त्याला जमीनीचे प्रमाणपत्र मिळाले. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन ही नंतर वसंत, गणेश व अनंत याचे नावाने ॲवार्ड पारीत झाले. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.२४/१० ला बाळारामची मुले यांची नावे लागली त्याबाबत मी तहसीलदार यांचेकडे तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र.२४/१० चा ॲवार्ड होताना मी त्याबाबत हरकत घेतलेली नाही. हे मला माहित नाही की, दाव्यामध्ये नमूद केलेल्या १२ जमीनींपैकी फक्त पहिल्या अनुक्रमांक १ ते ६ या जमीनी बाळया माया पाटील याच्या नावावरती होत्या. हे म्हणणे खरे नाही की, अनुक्रमांक १ ते ६ या जमीनी बाळया माया पाटील यांच्या मृत्यूनंतर श्रावण बाळया पाटील याच्या नावावरती आल्या. हे मला माहित नाही की, श्रावण बाळया पाटील याच्या हयातीमध्येच काही जमीनीचे वाटप झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील श्रावण बाळया पाटील हे दिनांक ११/०९/१९४८ रोजी मयत झाले व त्याची नोंद महसूल दप्तरी आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्रावण बाळया पाटीलच्या मृत्यूची नोंद लगेच १ महिन्याने फेरफार क्र.१५२७ द्वारे झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. १५२७ मध्ये

फक्त सहा जमीनींचा उल्लेख आहे. फेरफार क्र.३८५१ ची नोंद तलाठी यांना कोणी दिली, हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, फेरफार क्र.३८५१ ची नोंद ही श्रावण बाळया पाटील याच्या जमीनीबाबत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही बाळारामची जमीनी सर्व्हे क्र.२४/६, ५५/५ व २४/१० यांना चुकीची नोंद लावलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र.१५२७ ही फक्त श्रावणची मुले यांच्या नावाने झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दाव्यामध्ये श्रावण हा १९६५ साली मयत झाला हे खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे क्र.४०/३ व सर्व्हे क्र. ३४/२ हे दोनदा माझे दाव्यामध्ये परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद केले आहे. हे मला सांगता येणार नाही की, सर्व्हे क्र.४०/३ व सर्व्हे क्र. ३४/२ हे दोनदा माझे दाव्यामध्ये परिशिष्ट क्र.१ मध्ये नमूद केलेल्या मिळकती वेगवेगळया आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे क्र. ३४/९ ही जमीन बाळया माया पाटील किंवा श्रावण बाळया पाटील याचे नावे नव्हती. हे मला माहित नाही की, सर्व्हे क्र.३४/९ ही जमीन पांडुरंग पुंडलिक घरत यांचे नावावर होती व त्यांचे नावाने ॲवार्ड झालेला आहे.

वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

| माझेसमक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
|---|---|
| NINAD SHAM KAKADE — Digitally signed by NINAD SHAM KAKADE Date: 2024.12.10 17:31:03 +0530 | NINAD SHAM KAKADE — Digitally signed by NINAD SHAM KAKADE Date: 2024.12.10 17:31:08 +0530 |
| ( एन.एस. काकडे ) | ( एन.एस. काकडे ) |
| ३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल | ३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल |
| दिनांक १०/१२/२०२४ | दिनांक १०/१२/२०२४ |